कथा
नव्या युगाच्या



मंदार कात्रे

ई साहित्य प्रतिष्ठान

सादर करत आहे

कथा नव्या युगाच्या

मंदार कात्रे

कथा नव्या युगाच्या

लेखक: मंदार कात्रे

पत्ता : चोरवणे, तालुका संगमेश्वर,
जिल्हा रत्नागिरी 415803
फोन 8208722673
ईमेल: mandar.eng@gmail.com

मुखपृष्ठ- मंदार कात्रे

या पुस्तकातील लेखनाचे सर्व हक्क लेखकाकडे सुरक्षित असून पुस्तकाचे किंवा त्यातील अंशाचे पुनर्मुद्रण वा नाट्य, चित्रपट किंवा इतर रुपांतर करण्यासाठी लेखकाची लेखी परवानगी घेणे आवश्यक आहे. तसे न केल्यास कायदेशीर कारवाई (दंड व तुरुंगवास) होऊ शकते.

This declaration is as per the Copyright Act 1957 read with Sections 43 and 66 of the IT Act 2000. Copyright protection in India is available for any literary, dramatic, musical, sound recording and artistic work. The Copyright Act 1957 provides for registration of such works. Although an author's copyright in a work is recognised even without registration. Infringement of copyright entitles the owner to remedies of injunction, damages and accounts.

प्रकाशक :- ई साहित्य प्रतिष्ठान

www.esahity.com
esahity@gmail.com
Whatsapp- 9987737237
(विनामूल्य ईपुस्तकांसाठी फ़क्त नाव गाव कळवा)
प्रकाशन : २७ जुलै २०२६

छापिल प्रत खासगी वितरणासाठी उपलब्ध
देणगी मूल्य- रु. २५०/- फक्त
(१००% रक्कम लेखकाकडे छपाईचा खर्च म्हणून जाईल.)
(संपर्क- मंदार कात्रे - 8208722673

©esahity Pratishthan®2026

- विनामूल्य वितरणासाठी उपलब्ध.
- आपले वाचून झाल्यावर आपण हे फ़ॉरवर्ड करू शकता.
- हे ई पुस्तक वेबसाईटवर ठेवण्यापुर्वी किंवा वाचनाव्यतिरिक्त कोणताही वापर करण्यापुर्वी ई-साहित्य प्रतिष्ठानची लेखी परवानगी घेणे आवश्यक आहे.

लेखक परिचय

मंदार कात्रे

मूळ गाव रत्नागिरी जिल्ह्यातील नाणीज जवळचे चोरवणे . व्यवसायाने इंजिनियर असून नोकरीनिमित्त परदेशी वास्तव्य असते. लहानपणापासूनच अफाट वाचन अन लेखनाची प्रचंड आवड . सुमारे पंधरा वर्षापासून रत्नागिरीच्या स्थानिक वृत्तपत्रात तसेच विविध दिवाळी अंकांमध्ये विज्ञान व अध्यात्म यावर आधारित लेखमाला लिहीत असत . गेल्या सात वर्षापासून फेसबुक सह मायबोली , मिसळपाव , ऐसी अक्षरे , मी मराठी , उपक्रम इत्यादी मराठी सोशल साईट वर नियमितपणे लेखन. “ईसाहित्य”तर्फे “आभास हा” व क्वार्टर नंबर ३६५ हे लोकप्रिय कथासंग्रह प्रकाशित . सध्या भारतात वास्तव्य असून एक लघुकादंबरी व अन्य काही परदेशकथा यांचे लेखनकार्य सुरू.

या कथासंग्रहातील सर्व कथा कल्पित असून त्यांचा कोणत्याही वास्तव व्यक्ती, स्थळ अथवा प्रसंगांशी संबंध नाही.



मंदार कात्रे यांचे कथासंग्रह

कव्हरवर क्लिक करताच उघडतील



कथानुक्रम

1 घड्याळ

2 पाऊस

3 बात एक रात की...

4 एक रात्र प्रवासाची

5 बकुळा AI

6 सत्याचा क्षण

7 देवी

8 समाधी...

1 घड्याळ

धोधो पाऊस कोसळत होता. अगदी ढगफुटी झाल्यासारखं वाटत होतं. चिंचवली गावातल्या चिखलमिश्रित रस्त्यावरून एक माणूस छत्री घेऊन चालला होता. तो होता प्रणेश जोशी. त्याच्या चेहऱ्यावर एक विचित्र कर्तव्यभावना आणि जुन्या आठवणींचं मिश्रण होतं. आज दीपेशचं पहिलं वर्षश्राद्ध होतं. प्रणेशचा जिगरी दोस्त, दीपेश चव्हाण, जो गेल्या वर्षी दुबईत एका भीषण अपघातात गेला. त्या घटनेला बरोबर एक वर्ष पूर्ण झालं होतं.

प्रणेश आणि दीपेशची मैत्री कॉलेजमध्ये फुलली होती. दोघेही एकाच इलेक्ट्रिकल इंजिनिअरिंग डिप्लोमाच्या वर्गात होते. प्रणेश हा थोडा अबोल, अभ्यासू वृत्तीचा; तर दीपेश हा अत्यंत हुशार, मनमिळावू आणि जिद्दी. कॉलेजच्या प्रोजेक्टपासून ते कॅन्टीनमधल्या चहापर्यंत सगळीकडे ते एकमेकांच्या सोबतीने असायचे. डिप्लोमा पूर्ण झाल्यावर दोघांच्या आयुष्याच्या वाटा मात्र वेगळ्या झाल्या. नशिबाचा खेळ विचित्रच होता. प्रणेश जिल्ह्यातल्या छोट्या-मोठ्या कंपन्यांमध्ये रडतखडत कमी पगारावर काम करू लागला. त्याच्या स्वभावाला नोकरीतील राजकारण आणि खुशमस्करी पटत नसे. दुसरीकडे, दीपेशला मात्र दुबईत असलेल्या दूरच्या नातेवाईकांमुळे लगेचच एका चांगल्या कंपनीत नोकरी लागली. दीपेशच्या घरची परिस्थिती खूपच गरीब होती. गावाच्या शेतातलं एक शेतातलं घर, लहान भाऊ, बहीण आणि आई. वडील लहानपणीच वारल्यामुळे घराचा सगळा भार दीपेशवरच होता. दुबईची नोकरी म्हणजे त्याच्यासाठी आयुष्यभराचं स्वप्न सत्यात उतरल्यासारखं होतं. लगेच पासपोर्ट काढून तो दुबईला रवाना झाला. त्याच्या गैरहजेरीतही प्रणेश त्याच्या आईला भेटायला

जात असे, पण तो स्वतः मात्र आपल्या करिअरबद्दल निराश होता. कंपनीतील मॅनेजरशी झालेल्या एका कडाक्याच्या भांडणानंतर त्याने नोकरीला रामराम ठोकला आणि गावी परत येऊन वडिलांचा पारंपरिक भटजीपणाचा व्यवसाय सुरू केला. समाधान होतं, पण जेमतेम उपजीविका होती.

तशातच एक दिवस दीपेशच्या अपघाताची बातमी आली. दुबईत कामाच्या ठिकाणी झालेल्या एका भल्या मोठ्या दुर्घटनेत दीपेशचा जागीच मृत्यू झाला होता. गावात हळहळ सर्वजण हळहळत होते . प्रणेश पूर्णपणे खचून गेला. त्या दुर्दैवी घटनेला आज एक वर्ष पूर्ण झालं, म्हणून तो आज या मुसळधार पावसातही चिंचवलीला श्राद्धविधी करायला निघाला होता.

दीपेशच्या घरासमोर ओट्यावर तात्पुरता शामियाना ताणला होता. पावसामुळे वातावरणात एक उदास शांतता पसरली होती. प्रणेशने विधी सुरू केला. दीपेशचा लहान भाऊ रुपेश पिंडदानाला बसला. आई आणि बहीण कडेला बसून होत्या. मंत्रोच्चाराच्या आवाजात मिसळून परिसरात एक गहिरी शोकभावना दाटली होती. सगळा विधी पूर्ण झाल्यावर दीपेशच्या आईने साश्रू नयनांनी प्रणेशला जवळ बोलावलं. तिने एक बॉक्स त्याच्या हातात ठेवत म्हटलं, "हे घड्याळ , तुझा दोस्त दीपेश दुबईहून घेऊन आला होता. कंपनीच्या पहिल्या पगारातून त्याने हे घेतलं होतं. पण कधी वापरलं नाही '' आता त्याची आठवण म्हणून हे तूच वापर. त्याच्या आत्म्याला शांती लाभेल."

प्रणेशच्या हातात तो बॉक्स ठेवला तेव्हा त्याच्या अंगावर काटा आला. त्याने थरथरत्या हातांनी ते चकचकीत Casio कंपनीचे घड्याळ हातात घेतलं. त्याच्या डोळ्यांतून अश्रू वाहू लागले. जड अंतःकरणाने त्याने ते खिशात ठेवलं आणि दुसऱ्या दिवसापासून ते न चुकता हातात बांधू लागला.

दरम्यान, आयुष्य पुन्हा एकदा वळण घेणार होतं. कॉलेजमधला त्यांचा आणखी एक मित्र, अन्वर, दुबईतच नोकरी करत होता. त्यानेच एक दिवस प्रणेशला फोन करून दुबईच्या नोकरीच्या पेपर मधील जाहिरातींबद्दल सांगितलं आणि तातडीने पासपोर्ट काढायला लावला. प्रणेश फारसा उत्सुक नव्हता; भटजीपणात तो रमला होता,पण अन्वरच्या आग्रहाखातर त्याने ऑनलाइन अर्ज भरले. नियतीच्या मनात निराळंच काहीतरी होतं. काही महिन्यांतच मुंबईतील एका नामांकित एजन्सीकडून मुलाखतीचा कॉल आला. प्रणेशने इंटरव्ह्यू दिला आणि काय आश्चर्य! चांगल्या पगाराच्या नोकरीसाठी त्याची निवड झाली होती! आनंदाची बातमी गावी पोहोचली. आईच्या डोळ्यांत अभिमानाचे अश्रू होते. दुबईला जाण्यापूर्वी प्रणेश दीपेशच्या आईचे आशीर्वाद घ्यायला गेला. म्हातारीने त्याच्या डोक्यावर हात ठेवत म्हटलं, "जा बाबा, दीपेशची आठवण ठेव रे ."

दुबईचं ते चकाचक शहर, उंच गगनचुंबी इमारती आणि वेगवान जीवन पाहून प्रणेश भारावून गेला. कंपनीतली नोकरी अवघड होती पण प्रतिष्ठित होती. सगळं काही व्यवस्थित सुरू होतं. सुरुवातीचे काही महिने तो ते दीपेशने दिलेलं घड्याळ अभिमानाने वापरत होता. हळूहळू सगळं स्थिरस्थावर झाल्यावर एक दिवस, कंपनीच्या मित्रांबरोबर ड्युटी संपवून तो दुबईच्या एका प्रसिद्ध मॉलमध्ये गेला. तिथे एका घड्याळाच्या दुकानात त्याला एक अत्यंत आलिशान, महागडं ब्रँडेड घड्याळ दिसलं. दीपेशच्या घड्याळापेक्षा ते कितीतरी पटीने महाग आणि आधुनिक होतं. क्षणभर त्याला वाटलं, "आता तरी हे जुनं घड्याळ बदलायला हवं. दीपेशचं घड्याळ आता जुनं झालंय, आणि या नव्या शहरात, नव्या आयुष्यात ते कदाचित शोभणार नाही." त्याने ते चमकदार घड्याळ खरेदी केलं. दुसऱ्या दिवशी

त्याने ते नवं कोरं घड्याळ मनगटावर बांधलं आणि दीपेशचं जुनं घड्याळ उतरवून कपाटात ठेवलं.

आणि इथूनच खरी गंमत सुरू झाली.

त्या दिवशी कामावर गेल्यावर जणू काही अरिष्टच ओढवलं. नेहमीचा सहज सुटणारा कामाचा अहवाल देताना त्याची गडबड उडाली . प्रेझेंटेशन दरम्यान आकडे चुकले. सिनियर इंजिनिअरने सगळ्यांसमोर त्याची चांगलीच खरडपट्टी काढली. त्याचं डोकं सुन्न झालं. दुपारी कँटीनमध्ये हातातली कॉफी त्याच्या नव्या शर्टवर सांडली. सरळ कपडे बदलायला जावं लागलं. तिथून परत कामावर येताना लिफ्टमध्ये तो एकटा अडकला. त्या बंद खोलीत एकटा कोंडला गेला. पार घामाघूम होऊन, तणावाने थकून तो संध्याकाळी घरी परतला. बिछान्यावर पडल्यावर त्याची नजर कपाटात ठेवलेल्या जुन्या घड्याळाकडे गेली. "काय दिवस गेला आज," तो पुटपुटला. पण चमत्कारिक गोष्ट म्हणजे, त्रासाची ही मालिका दुसऱ्या दिवशीही चालूच राहिली. साईटवर काम करताना एक ठिकाणी शॉर्टसर्किट झालं , सुदैवाने तो बचावला. तिसऱ्या दिवशी त्याच्या डिपार्टमेंटच्या हिशोबात चूक आढळून आली आणि संशयाची सुई त्याच्याकडे फिरली. सिनियर मॅनेजमेंटने तपासणी सुरू केली. प्रणेश पूर्णपणे घाबरला . आयुष्यात पहिल्यांदा त्याला दुबईसारख्या शहरात टिकून राहण्याची त्याला भीती वाटू लागली.

चिंताग्रस्त अवस्थेत तो त्या रात्री बेडरूममध्ये बसला होता. त्याची नजर कपाटाच्या काचेआड पडलेल्या त्या जुन्या घड्याळावर गेली. काच उघडून त्याने ते हातात घेतलं. दीपेशची आठवण झाली. कॉलेजमध्ये कुठल्याही संकटात दीपेश ज्या आत्मविश्वासाने त्याला सावरत असे, तो चेहरा डोळ्यांसमोर आला. एक विलक्षण शांतता त्याच्या मनात उतरली. त्याने तो

नवा महागडे ब्रँडेड घड्याळ काढून टेबलवर ठेवलं आणि दीपेशचं ते जुनं, कालबाह्य वाटणारं घड्याळ पुन्हा एकदा प्रेमाने मनगटावर बांधलं . त्या रात्री तो गाढ झोपला.

दुसऱ्या दिवशी कमालच झाली . सकाळी कामावर पोहोचताच, आदल्या दिवशीच्या हिशोबातील गडबडीबद्दल मुख्य लेखापालाने त्याला बोलावलं. मात्र, तपासणीअंती असं लक्षात आलं की चूक ही सॉफ्टवेअर अपडेटमुळे झालेली सिस्टीम एरर होती, त्याची काहीच जबाबदारी नव्हती. सिनियर इंजिनिअरने त्याची जाहीर माफी मागितली. त्यानंतर साईटवर काहीतरी तांत्रिक समस्या आली. सगळे वरिष्ठ गोंधळात पडले असताना, प्रणेशला अचानक एक जुगाड सुचला, जो त्याने आणि दीपेशने कॉलेजमध्ये एका प्रोजेक्टसाठी एकत्र बसून केला होता. त्याच तंत्राचा वापर करून त्याने समस्या काही मिनिटांत सोडवली. ऑफिसमध्ये त्याच्या कौतुकाचा पाऊस पडला. मॅनेजरने स्टाफ मिटिंगमध्ये त्याचं नाव घेऊन कौतुक केलं. दिवस अगदी सहज आणि आनंदात पार पडला.

प्रणेशला हे सगळं विचित्र वाटू लागलं. तो दुबईच्या कोलाहलात बसून विचार करायचा. त्या घड्याळाकडे बघताना त्याला एक गोष्ट जाणवायची; ती म्हणजे दीपेशची सोबत. हे घड्याळ म्हणजे निव्वळ एक वस्तू नव्हती, तर त्यात दीपेशचा आत्मा, त्याचे आशीर्वाद सामावले होते. नवीन महागडं घड्याळ वापरून त्याने आपल्या मूळ स्वभावाप्रमाणे कदाचित नकळत अहंकार जागा केला असावा, पण या जुन्या घड्याळाने त्याला जमिनीवर ठेवलं.

एका सुट्टीच्या दिवशी सकाळी तो समुद्रकिनारी बसला होता. सूर्य उगवत होता. त्याने हातातलं ते जुनं घड्याळ काढून नीट निरखून पाहिलं. त्याच्या काचेवर एक छोटीशी ओरखडी होती, ती दीपेशच्या अपघाताच्या

दिवशीची. डायलवरचे काटे नियमितपणे चालत होते, जणू काळाच्या पलीकडे जाऊन दीपेश अजूनही त्याच्यासोबत चालत होता. "दीप्या, तू गेलास, पण मला सोडून नाही गेलास ना?" प्रणेश पुटपुटला. त्याच्या डोळ्यांत पाणी तरळलं, पण हे दुःख नव्हतं. ही एका अदृश्य शक्तीबद्दलची कृतज्ञता होती. ते नवीन महागड ब्रँडेड घड्याळ मात्र कायमचं कपाटात धूळ खात पडून राहिल.

वर्ष संपत आलं. प्रणेश आता कंपनीचा सुपरवायझर झाला होता. पगार चांगला होता, प्रतिष्ठा होती. पण तो दर महिन्याच्या पहिल्या तारखेला, दीपेशच्या आईच्या नावाने पैसे पाठवणं मात्र विसरत नसे. तो एकटा असताना अनेकदा ते घड्याळ हातात घेऊन बोलत बसे. त्याला खात्रीने जाणवायचं की दीपेशचा आशीर्वाद किंवा अस्तित्व सदैव त्याच्या भोवती आहे, त्याची मदत करतोय. नोकरीतल्या यशाचं श्रेय तो नेहमी त्या घड्याळाला द्यायचा. कारण त्याला कळून चुकलं होतं की खरी मैत्री ही शरीराने नव्हे, तर आत्म्याने असते. आणि दीपेशचं ते प्रेम, ती शक्ती, एका घड्याळाच्या रूपाने त्याच्या हृदयाला टेकून त्याला संकटांपासून सांभाळत होती.

धोधो पाऊस कोसळत असतानाही, आयुष्याच्या वादळातही, प्रणेश आता कधीच एकटा नव्हता.

2 पाऊस

ऋषीने आयुष्यातली तिशीची पायरी नुकतीच चढली होती. कोकणातल्या त्या लहानशा गावात, गोठीवरे, जिथे नारळी-पोफळीच्या सळसळत्या बागा आणि समुद्राचा गंध यांनी घरं वेढलेली, तिथं तो तिसऱ्या पिढीतला ब्राह्मण पुरोहित म्हणून स्थिरावला होता. हजारभर माणसांच्या गावातली प्रत्येक धार्मिक गरज—सत्यनारायणापासून ग्रहशांतीपर्यंत—ऋषीच्या हातून पार पडायची. वडिलांच्या जाण्यानंतर आई एकटीच होती, पण तिच्या सेवेची जबाबदारी आणि पौरोहित्याची सुरेल लय यात त्याला एक विलक्षण समाधान होतं. लग्नाच्या बाबतीत मात्र तो उदासीन होता. “आता लग्नाचं बघ,” आई नेहमी म्हणायची, पण ऋषी फक्त हसून टाळायचा. मनात कुठेतरी एका वेगळ्याच जोडीदाराची अंधूकशी आस होती, पण तो स्वतःही ती कबूल करत नसे.

पण २००५ सालच्या जून महिन्याने हा सगळा शांत तलाव ढवळून काढला. शहरातल्या भावाचा लोकेशचा फोन आला. चिपळूण ला मोठा यज्ञ होता, आणि ऋषीची मदत हवी होती. ऋषीने पोतडी बांधली आणि शंभर किलोमीटर दूर असलेल्या गावाकडे एसटी बस पकडली. वाटेत पावसाने अशी धुवाँधार सुरु घेतली की पूल-रस्ते सगळे पाण्याखाली गेले. कसाबसा तो लोकेशच्या गावी पोचला, आणि दुसऱ्याच दिवशी कळलं की दरड कोसळून सगळीकडची वाहतूक बंद—आता आठ दिवस तरी तिथंच अडकायचं होतं. यज्ञाच्या कामात मन रमवत असतानाच मनात मात्र आईची काळजी होतीच. यज्ञ संपल्यावर लोकेशने सांगितलं, “रस्ता रिपेअर करून गाड्या सुरु व्हायला अजून तीन-चार दिवस लागतील.” तेव्हा

ऋषीला आठवलं—बारा-तेरा किलोमीटरवर त्याची आत्या राहायची. “मी चालत जातो. तिथून परतीचं बघेन.”

दुसऱ्या दिवशी पहाटेच तो निघाला. पावसाने नुकताच दम धरला होता. ओल्या मातीचा सुगंध, पानांवरचे पाण्याचे थेंब, आणि नदीच्या खळखळाटाने भरलेली ती वाट म्हणजे जणू वेगळंच जग होतं. दुपारपर्यंत तो आत्याच्या गावात पोचला. गावाचं दृश्य पाहून तो थक्क झाला— बांबू-चिऱ्याची कौलारू घरं, अंगणात तुळस, शाळेच्या पायऱ्यांवर बसून मस्ती कारणरी पोरं . आत्याने त्याला पाहताच मायेने जवळ ओढलं. “अरे ऋष्या, पोरा, पावसातून चालत आलास? आत ये.” गरम पाण्याने स्नान, पोटभर भाकरी-भजी—तो थोडा तरतरीत झाला. संध्याकाळी आत्या म्हणाली, “जा थोडा गाव फिरून ये. नदीकाठी एक जुनं मंदिर आहे, तिथं बसलास की मन शांत होतं.”

ऋषी नदीकाठी निघाला. नदी आपल्या पूर्ण उधाणात वाहत होती—वेगाने धावणारी. मंदिर दिसलं ते अत्यंत प्राचीन, काळपटलेल्या दगडांचं, कोरीव खांबांचं. मंदिरासमोर नदीचा एक छोटा ओढा शिवलिंगाच्या पायाशी लवत होता. ऋषीने आत जाऊन एका स्तंभाला टेकून डोळे मिटले. बाहेरचा पावसाचा सूर, नदीचा गाज, आणि आतल्या मनाची स्तब्धता यात तो हरवून गेला. त्याचे मंत्र हळूहळू थांबले, आणि तो फक्त त्या गूढ शांतीत तरंगत राहिला. किती वेळ गेला कळलं नाही.

तेवढ्यात एका मंजुळ आवाजाने त्याची तंद्री भंगली. “एवढा वेळ डोळे मिटून बसलात, पाऊस परत आला तर भिजून जाल बरं का.” ऋषीने डोळे उघडले. समोर एक तरुण मुलगी उभी होती—साधी साडी, केसांवर पडलेले पावसाची थेंब , हातात तांबड्या कुंकवाचा करंडा, आणि डोळ्यांत नदीच्या पाण्यासारखीच खोल तरलता. ऋषी एकदम भानावर आला. “अहो, मी...

मी याच मंदिरासाठी आलो होतो. इतकं शांत आहे की तंद्रीच लागली.” ती हसली, तिच्या गालावर खळी पडली. “हे असंच आहे हे मंदिर. इथं बसलं की वेळेचं भानच राहत नाही. तुम्ही नवीन कोणी दिसता. आत्याबाईंकडे आलेलं का?” ऋषीने हो म्हणत आपली ओळख सांगितली. ती म्हणाली, “मी सावली. शास्त्रीबुवांची मुलगी. आत्यांच्या शेजारीच आमचं घर. दर सांजेला मंदिरात दिवा लावायला येते. आज तुम्हाला इथं बसलेलं पाहून वाटलं जागं करावं.”

ते दोघं मंदिराच्या पायऱ्यांवर बसले. बाहेर परत पावसाची रिमझिम सुरू झाली होती. सावलीने विचारलं, “ माझ्या आजीबाई म्हणायच्या, मंदिरातल्या शिवलिंगाला अभिषेक करताना जी भावना असते, ती फक्त मनाने ओळखता येते.” ऋषीने तिला एक साधा मंत्र म्हणून दाखवला. तिने डोळे मिटून तो म्हणून पाहिला. तिच्या आवाजात एक विलक्षण गोडवा होता, जो कोकणी मातीतल्या सुपारीच्या झाडासारखा हिरवा आणि आर्द्र होता. पावसाच्या थेंबांबरोबर तिचा आवाज आणि मंदिरातल्या शांतीचा तो मिलाप ऋषीच्या मनाला अजब गारव्याने भरून गेला.

दुसऱ्या दिवशी सकाळी ऋषीला आत्या म्हणाली, “जा, थोडं गाव पाहा. सावलीच्या बाबांना मदत हवी असेल शेतात, पण तिला सांग मी पुरणपोळीचं आमंत्रण दिलंय.” ऋषीच्या मनात अनाहूतपणे सावलीचं नाव घुमलं. तो बाहेर पडला. वाटेत पुन्हा नदीकाठी गेला तर ती तिथंच होती—एका दगडावर बसून पावसाचं पाणी पितळी भांड्यात भरत होती. “अहो पुरोहितदेवा, इकडे या.” तिने हसत बोलावलं. “कालचा मंत्र मला अजूनही आठवतोय.” तिने पुन्हा मंत्र म्हणून दाखवला. ऋषीने दुरुस्ती केली नाही, कारण त्या चुकीच्या उच्चारातही एक निरागसता होती. ते दोघं बोलत राहिले—तिचं गाव, तिचं शेत, तिचं नदीवरचं प्रेम. ती म्हणाली, “ही नदी

अशीच दर पावसाळ्यात उधाणते. पण मला तिचा हा रौद्र रूपही आवडतो. इतकं निर्भय वाटतं तिला पाहिलं की. तुम्हाला?" ऋषीने आपल्या गावाबद्दल, आईबद्दल, यज्ञाबद्दल सांगितलं. त्याला हेही समजलं की सावलीचे वडील याच गावचे पुरोहित होते.

दोन दिवस असेच निघून गेले. सावलीशी बोलताना ऋषीला असं वाटायचं, की ही मुलगी जणू या गावातल्या मातीचं मूर्तिमंत रूप आहे—साधी, उत्स्फूर्त, पण आतून खूप सशक्त. एका सायंकाळी तो पुन्हा मंदिरात गेला. यावेळी त्याच्या मनात सावलीचा चेहरा घोळत होता. तो डोळे मिटून बसला, पण एकाग्रता होईना. बाहेर पाऊस जोरात कोसळत होता. अचानक पायऱ्यांवर पावलांची चाहूल आली. सावली होती—भिजलेली, हातात पेटता दिवा. "वीज गेली गावात. पण मंदिरात अंधार नको म्हणून दिवा घेऊन आले." ती शिवलिंगापाशी दिवा ठेवू लागली, तेवढ्यात पावसाचा एक जोरदार झोत वाऱ्यासह मंदिरात शिरला. दिवा विझला. सावलीने हात पुढे केला, पण ऋषीने नकळत तिचा हात हातात घेतला. "थांबा, मी लावतो." दोघांच्या हातांचा स्पर्श झाला. पावसाच्या थंडीत तो स्पर्श विजेसारखा झळाळून गेला. क्षणभर दोघंही स्तब्ध. मग ऋषीने काडेपेटी शोधून दिवा पुन्हा लावला. त्या मंद प्रकाशात सावलीच्या डोळ्यांत एक न बोललेला प्रश्न होता. पण ती काहीच बोलली नाही. थोडा वेळ दोघं तिथं शांत उभे राहिले. नदीच्या गाजेबरोबर काहीतरी अनामिक त्यांच्यात बोललं.

आठव्या दिवशी पहाटे आकाश निरभ्र झालं. रस्ता खुला झाल्याची बातमी आली. ऋषीने आत्याची आणि सावलीच्या कुटुंबाची भेट घेतली. त्याने जाताना सावलीला मंदिरात पुन्हा एकदा गाठलं. यावेळी तो घाबरला नाही. तो म्हणाला, "सावली, मला परत जावं लागेल. पण हे सांगतो, तुला

भेटल्यापासून माझं आयुष्य बदललं आहे. मी परत येईन. आईशी बोलून, तुझ्या वडिलांकडे लग्नाचं मागणं घालायला.” सावलीचे डोळे भरून आले. “खरंच?” तिने हळूच विचारलं. ऋषीने होकारार्थी मान हलवली.

बसने परतताना ऋषीचं मन हलकं झालं होतं. पावसाळ्याने सगळीकडे हिरवाई पसरली होती, पण त्याच्या मनात आता वेगळ्याच फुलांचा बहर होता. गावी परतताच त्याने सगळी हकीकत आईला सांगितली. आईने लगेच होकार दिला. “तुझा आनंद म्हणजेच माझा आनंद. आणि ती शास्त्रीबुवांची मुलगी आहे, हे तर सोन्याहून पिवळं.”

पुढच्याच महिन्यात, पावसाळ्याच्या सरींना निरोप देताना, ऋषी आपल्या आईसह पुन्हा त्या गावी गेला. आत्याने आणि सावलीच्या आई-वडिलांनी मोठ्या उत्साहाने त्यांचं स्वागत केलं. त्याच नदीकाठच्या प्राचीन मंदिरात, जिथे त्यांची पहिली भेट झाली होती, तिथेच सावली आणि ऋषीचा विवाह ठरला. मंदिराच्या साक्षीने, नदीच्या सुरांच्या साथीने, त्यांनी एकमेकांच्या हातात हात दिला. लग्नाच्या दिवशी आभाळ पूर्ण निळं होतं. फक्त मंदिराच्या पायऱ्यांवर काही पावसाचे शिंतोडे कोरडे झालेले नव्हते, जणू त्या आठ दिवसांतल्या पावसाने आपली साक्ष कायमची सोडून दिली होती. ऋषीने सावलीच्या मंगळसूत्र बांधताना तिच्या डोळ्यांत पाहिलं. तिथं नदी, पाऊस, मंदिर आणि आता सबंध आयुष्य एकत्र दिसत होतं. तो अनुभव त्याला कधीच विसरता येणार नव्हता—कारण त्या वादळाने त्याला केवळ अडकवून ठेवलं नव्हतं, तर त्याच्या आयुष्यातलं सर्वांत सुंदर वादळ भेटवलं होतं.

3 बात एक रात की...

१४ ऑगस्ट १९९७. संध्याकाळचे साडेपाच वाजले असतील. गुहागरच्या पॉवर प्लांटच्या बांधकाम साईटवरून गिरीश बाहेर पडला. हातात एक छोटी बॅग, अंगात एक फिकट निळ्या रंगाचा विंडचीटर. त्याच्या डोळ्यांत घरी जाण्याची ओढ होती. पाली, रत्नागिरी – त्याचं गाव. उद्या १५ ऑगस्ट, स्वातंत्र्यदिनाची सुट्टी. पन्नासावा स्वातंत्र्यदिन, सुवर्णमहोत्सवी वर्ष. सगळीकडे देशभक्तीचं वातावरण. गिरीशच्या मनातही एक वेगळाच उत्साह होता. पण मनाच्या कोपऱ्यात एक काळजीही होती. बहिणीचं लग्न जवळ आलं होतं. पैशांची चणचण होती. घरची परिस्थिती बेताची. पगाराचे पैसे हातात होते, पण ते अपुरे होते. आईसाठी गुहागरच्या बाजारातून घेतलेली एक नवीन साडी बॅगमध्ये होती. पावसाची रिपरिप सुरू होती. आकाशात ढगांचा गडगडाट सुरू होता, पण गिरीशच्या मनात घर गाठण्याची घाई होती.

गुहागरहून पालीला जाण्यासाठी तसा थेट प्रवास नव्हता. एसटी बसेस अपुऱ्या होत्या, खासगी जीपाही होत्या पण गिरीशला पैसे वाचवायचे होते. त्याने हात दाखवून ट्रक, टँकर अशा गाड्या पकडत प्रवास सुरू केला. सुरुवातीला एका ट्रकने त्याला चिपळूणपर्यंत सोडलं. चिपळूणला पोहोचेपर्यंत रात्रीचे दहा वाजले. पाऊस चांगलाच कोसळत होता. चिपळूण बस स्थानकावर काही गाड्या उभ्या होत्या, पण प्रवासी कमी होते. तिथून त्याला एक टँकर दिसला. हातखंबा गावाच्या दिशेने जाणारा. गिरीशने हात दिला. ड्रायव्हरने मान हलवली आणि तो टँकरच्या केबिनमध्ये बसला.

टँकरची केबिन गरम होती. बाहेर पावसाची झडी. ड्रायव्हर एक भला माणूस वाटत होता, क्लीनर नव्हता बरोबर. गाडीत जुनं हिंदी गाणं लागलं

होतं. गिरीशने सुटकेचा नि:श्वास टाकला. "हातखंबा उतरायचंय मला," तो म्हणाला. "हो, मला पुढे जायचंय, पण मी तुला तिथं सोडतो," ड्रायव्हर उत्तरला. चिपळूण सोडून टँकर रस्त्याला लागला. कोकणातले वळणावळणाचे रस्ते, पावसाने चिंब भिजलेले. गिरीश खिडकीतून बाहेर पाहत राहिला. रस्त्यावर फारशी वर्दळ नव्हती. अचानक, हातखंबा फाट्याच्या थोडं आधी एका ढाब्याजवळ टँकर थांबला. "चहा पितो की," ड्रायव्हर म्हणाला. गिरीशलाही हवा होताच. दोघे उतरले.

ढाबा बऱ्यापैकी उघडा होता, पण आत काही माणसं दिसत होती. ड्रायव्हर आत गेला. चहा आला. गिरीश चहा पीत असताना त्याच्या लक्षात आलं की ड्रायव्हर ढाब्याच्या मालकाशी काहीतरी मान-मानेनं बोलत होता. ते दोघे टँकरच्या मागच्या बाजूला गेले. गिरीशला कुतूहल वाटलं. तो सावलीतून पाहू लागला. ड्रायव्हरने टँकरच्या वरच्या झडपेजवळ एक पाईप लावला आणि एका मोठ्या डब्यात काहीतरी काढू लागला. गिरीशला सुरुवातीला वाटलं पाणी असेल, पण तो द्रव पाहून त्याच्या अंगावर काटा आला. ते नॅप्था होतं. टँकरमध्ये नॅप्था भरलेला होता. ड्रायव्हर ते नॅप्था चोरून विकत होता ढाब्याच्या मालकाला! हातोहात व्यवहार झाला. पैशांची देवाण-घेवाण. गिरीश घाबरला. त्याने नजर चुकवली. काही दिसलेच नाही असं भासवलं. ड्रायव्हर परत आला. त्याच्या चेहऱ्यावर एक विजयी हास्य होतं. "चला," तो म्हणाला. गिरीश गपचूप गाडीत बसला. भीतीने त्याचा गळा कोरडा पडला होता.

रात्रीचे बारा-साडेबारा झाले असतील. टँकर हातखंबा गावाच्या वळणावर येऊन थांबला. "उतर इथं," ड्रायव्हर म्हणाला. गिरीशने पटकन बॅग घेतली. पायऱ्या उतरताना त्याची नजर एकदम ड्रायव्हरच्या डोळ्यांशी भिडली. त्या डोळ्यांत एक धमकी होती. "ऐक, जे काही पाहिलंस ते विसरून जा. नाहीतर परिणाम चांगले होणार नाहीत," ड्रायव्हर बरोबर

दबक्या आवाजात पण कणखरपणे म्हणाला. गिरीशने काही बोलायचं धाडस केलं नाही. फक्त मान हलवली. तो उतरला. टँकर निघून गेला. हातखंब्याच्या त्या फाट्यावर रात्रीची शांतता होती. समोर एक पेट्रोल पंप होता, शेजारी एक छोटी चहाची टपरी. टपरी बंद होती. बाहेर एक लाकडी बाक होता. पाऊस थांबला होता, पण वारं बोचरं होतं. हातखंब्याहून पालीला जाण्यासाठी गाडी मिळायची शक्यता धूसर होती. पण गिरीशने हार मानली नाही.

तो त्या बाकावर येऊन बसला. घड्याळात पाहिलं, पहाटेचे दोन वाजले होते. पोटात भीतीचा गोळा होता, पण मन घराकडे धाव घेत होतं. खिशात छोटं ट्रान्झिस्टर रेडिओ होतं. विरंगुळा म्हणून त्याने ते चालू केलं. गाण्याच्या स्टेशनचा शोध घेत होता, पण प्रत्येक स्टेशनवर एकच गोष्ट लागली होती. पंतप्रधान अटलबिहारी वाजपेयी यांचं लाल किल्ल्यावरून भाषण. ती स्वातंत्र्याची सुवर्णरात्र होती. "मैं देश की जनता को..." गिरीशने रेडिओचा आवाज मंद केला. रात्रीच्या सामसुमीत वाजपेयींचा तो गंभीर आवाज घुमत होता. "हमारा देश आजादी का स्वर्णिम वर्ष मना रहा है..." गिरीश ऐकत राहिला. मनात विचार आला – देश स्वातंत्र्याचं सोनं साजरं करतोय, तिकडे मी एका चोरीच्या साक्षीदाराच्या भीतीने इथं बाकावर बसून कुडकुडतोय. किती विचित्र योगायोग.

थोड्या वेळाने त्याने रस्त्यावर येऊन हात दिला. दोन-तीन ट्रक आले, पण थांबले नाहीत. एक मोटारसायकल गेली, तिनेही दुर्लक्ष केलं. निराश होऊन तो परत बाकावर बसला. तेवढ्यात पेट्रोल पंपाच्या दिशेने काही हालचाल झाली. गिरीशने पाहिलं, दोन माणसं पंपाच्या मागच्या भिंतीवरून उड्या मारून पळताहेत. त्याने मान वळवली. त्या दोघांच्या हातात पिशव्या होत्या. काहीतरी चुकलंय हे त्याच्या लक्षात आलं. थोड्याच वेळात

पोलिसांची जीप येऊन थडकली. पेट्रोल पंपावर दरोडा पडला होता! मोठी चोरी झाली होती.

पोलीस इकडेतिकडे पाहू लागले. त्यांना समोरच्या बाकावर बसलेला गिरीश दिसला. दोन पोलीस त्याच्याकडे आले. एका जणाने टॉर्च मारला. "कोण आहेस तू? इथं काय करतोयस?" गिरीशने सगळं खरं सांगितलं – गुहागरवरून पालीला चाललोय, गाडी मिळेना, हातखंब्याला उतरलो. पोलिसांना संशय आला. एकाने त्याची बॅग तपासली. आत नवीन साडी, कपडे, काही कागदपत्रं. "ही साडी कुठून आणलीस?" पोलिसाने विचारलं. गिरीश घाबरला. "गुहागरच्या बाजारातून आईसाठी आणली," तो म्हणाला. पोलिसांना पूर्ण खात्री नव्हती. त्यांनी त्याला तिथंच बसायला सांगितलं. "हलू नकोस. आम्ही येतोय." ते दोघे पंपाच्या बाजूला गेले. गिरीशचा जीव टांगणीला लागला. आज काय नशीब घेऊन निघालो? आधी नॅप्था चोरी, आता पेट्रोल पंप दरोडा, आणि मी प्रवासी, पण पोलिसांच्या संशयाच्या भोवऱ्यात.

रात्र सरत नव्हती. पाऊस पुन्हा सुरू झाला. बाकावर बसून गिरीश थंडीने कुडकुडत होता. विंडचीटर अंगाला चिकटलं होतं. पोलीस त्याच्याकडे लक्ष ठेवून होते. त्याला हालचाल करू देत नव्हते. गिरीशने मनाची हिंमत एकवटली. रेडिओवर वाजपेयींचं भाषण संपलं होतं. आता देशभक्तीची गाणी लागली होती. "ऐ मेरे वतन के लोगों, जरा आँख में भर लो पानी..." गिरीशने डोळे मिटले. थंडी, भीती, असहायता या सगळ्यात ते गाणं ऐकताना त्याचे डोळे खरोखरच भरून आले. स्वातंत्र्यदिनाच्या या रात्री, स्वतःच्या देशाच्या मातीत तो स्वतःला एका चोरासारखं परकं वाटत होता.

पहाट झाली. आकाश फिकट पिवळं झालं. पाऊस थांबला. पोलिसांनी पंपाच्या चौकशीतून गिरीशला निर्दोष ठरवलं. त्याच्याकडे काही

पुरावे नव्हते. "जा, पण नीट जा. रात्रीच्या वेळी एकट्याने प्रवास करू नकोस," एका पोलिसाने बजावलं. गिरीशने सुटकेचा नि:श्वास टाकला. पोलीस जीप निघून गेली. आता सकाळची पहिली एसटी बस यायला थोडा वेळ होता. गिरीश बाकावरून उठला. थंडीने शरीर सुन्न झालं होतं. त्याने हात-पाय झटकले. तेवढ्यात त्याची नजर चहाच्या टपरीच्या मागच्या बाजूला गेली. तिथं झुडुपांमध्ये काहीतरी पडलेलं होतं. एक काळी पिशवी. गिरीश हळूच तिथं गेला. भोवती पाहिलं. कोणीच नव्हतं. त्याने ती पिशवी उचलली. जड होती. उघडून पाहिलं तर आत पैशांच्या बंडल होत्या!! त्याच्या हातापायांना कापरं भरलं. पन्नास हजार रुपये. त्याच्या डोळ्यांसमोर बहिणीचा चेहरा आला. लग्नाचा खर्च. आईची काळजी. गावातल्या शाळेची अवस्था. त्याचं मन दोलायमान झालं. हे पैसे परत करायचे का? कोणाचे आहेत? दरोडेखोरांचे का? पोलिसांना द्यायचे का? पण पोलीस तर निघून गेले. आणि दरोडेखोरही पळून गेले. ही पिशवी बहुदा त्यांच्या गडबडीत इथं पडली असावी.

गिरीशने आजूबाजूला पुन्हा पाहिलं. सामसूम होती. पावसाने सगळं धुतलं होतं. एक निर्णय त्याने घेतला. थरथरत्या हातांनी त्याने ती पिशवी आपल्या बॅगमध्ये घातली. मनात विचारांचं काहूर माजलं होतं. "हे चुकीचं आहे... पण गरजही खरी आहे. बहिणीचं लग्न... आईची स्वप्नं... शाळेला हवी ती मदत... देवानेच दिली असेल ही रक्कम..." मनाची समजूत घालत तो बाकावर परत आला. सकाळची एसटी बस आली. ती पालीला जाणारी होती. गिरीश बसमध्ये बसला. खिडकीतून बाहेर पाहताना त्याला जग विलक्षण वाटत होतं. पिशवीचं वजन खांद्यावर नव्हतं, तर मनावर होतं. पण दुसरीकडे एक उभारीही होती.

गिरीशच्या पालीच्या घरासमोर बस थांबली. सकाळचे साडेसहा. घराबाहेर आई झाडू मारत होती. गिरीशला पाहून तिच्या चेहऱ्यावर आनंद

उमटला. "आलास की रे रात्रीच्या गाडीने? मी वाटच पाहत होते," ती म्हणाली. गिरीशने हसण्याचा प्रयत्न केला. पाया पडून आशीर्वाद घेतले. घरात शिरला. पोटात गोळा आला होता तो निवळला. घर म्हणजे स्वर्गच. आईने चहा केला. गिरीशने बॅग उघडली. आईला साडी दिली. तिच्या चेहऱ्यावर कौतुक होतं. "बाबा रे, किती छान," ती साडी न्याहाळू लागली.

गिरीशने मग हळूच ती काळी पिशवी बाहेर काढली. आईने आश्चर्याने विचारलं, "हें काय रे?" गिरीशने खोटं बोलण्याचं ठरवलं. खरं ते सांगणं शक्य नव्हतं. "आई, कंपनीत मला बोनस मिळाला. प्रकल्पाचं काम वेळेवर पूर्ण झालं म्हणून खास बक्षीस." आईचे डोळे आनंदाने चमकले. " आई अवाक् झाली. "एवढे पैसे? देवा, तुझं भलं करो. आता सुमनचं लग्न नीट करता येईल." गिरीशने आईला मिठी मारली. पण मनात एक बोच होतीच. खोटं बोललो, चोरीचे पैसे स्वतःचे म्हणून वापरले. हे बरोबर आहे का? पण परिस्थितीपुढे त्याने सद्सद्विवेक बाजूला ठेवला.

पुढचे काही महिने गिरीशने त्या पैशांचा वापर केला. बहिण सुमनचं लग्न धूमधडाक्यात पार पडलं. आईच्या चेहऱ्यावर समाधान होतं. नातेवाईकांनी कौतुक केलं. पण गिरीशला रात्री झोप येत नव्हती. त्या रात्रीचं स्वप्न पडायचं. पोलीस, टँकर, पाऊस, आणि ती काळी पिशवी. कधीकधी वाटायचं की पोलीस येतील आणि सगळं उघडं होईल. पण तसं काही झालं नाही. काळ जात राहिला.

गिरीशने ठरवलं की या पैशांचा काही भाग चांगल्या कामासाठी वापरायचा. त्याने गावातल्या जुन्या शाळेसाठी एक देणगी दिली. नवीन वर्ग खोल्या बांधल्या गेल्या. पुस्तकं आणली गेली. गावकऱ्यांनी गिरीशचं कौतुक केलं. "गिरीशराव, तुम्ही तर देवदूत आहात. गावाच्या मुलांचं भविष्य घडवलंत." गिरीश हसायचा, पण आतल्या आत त्याला अपराधी वाटायचं. हे कौतुक खोटं होतं. ही कीर्ती चोरीच्या पैशांवर उभी होती. त्याने मनाशी

निश्चय केला की जेव्हा शक्य होईल, तेव्हा हे पैसे मूळ मालकापर्यंत पोहोचवायचा प्रयत्न करायचा. पण मूळ मालक कोण? दरोडेखोर? की पेट्रोल पंप? की आणखी कुणी? हा प्रश्न अनुत्तरितच राहिला.

दर १५ ऑगस्टला गिरीश त्या रात्रीची आठवण काढतो. वाजपेयींच्या भाषणाचे शब्द आठवतो. आणि स्वतःशीच हसतो. रेडिओवर पुन्हा तेच गाणं लागतं, "ऐ मेरे वतन के लोगों..." पण यावेळी त्याचे डोळे भरून येतात. कारण त्याला माहिती आहे की स्वातंत्र्य म्हणजे फक्त देशाचं नाही, तर मनाचंही. भीतीतून, खोटेपणातून, स्वार्थातून मन मोकळं करणं म्हणजे खरं स्वातंत्र्य. आणि ते त्याला अजून मिळवायचं होतं. त्या रात्री त्याने एक चूक केली होती. ती चूक सुधारण्याची संधी त्याला लवकरच मिळणार होती... पण ती गोष्ट पुढच्या स्वातंत्र्यदिनाची.

4 एक रात्र प्रवासाची

१९९४ साल. जून महिन्याचा शेवटचा आठवडा. मुंबईतून गोव्याला जाणाऱ्या एका खाजगी लक्झरी बसच्या मागच्या सीटवर बसून बारा वर्षांचा सागर खिडकीबाहेरचा मुसळधार पाऊस पाहत होता. वायपरचा आवाज, इंजिनचा आवाज आणि हवेचा शिट्टासारखा आवाज यातच तो हरवला होता. त्याच्या शेजारी त्याचे दोन मामा बसले होते. सुट्टीत मुंबईला जाऊन जुनमध्ये परत गावी जायचं, हा नेहमीचा कार्यक्रम. पण ही बससफर नेहमीपेक्षा वेगळी ठरणार होती.

दुपारी मुंबई सोडल्यापासून पाऊस सुरूच होता. खिडकीच्या काचेवर पाण्याचे लोट कोसळत होते आणि बाहेरचं जग धूसर दिसत होतं. पनवेल पार केलं आणि बस एका ढाब्याजवळ थांबली. सगळे प्रवासी नाश्ता करण्यासाठी उतरले. सागरच्या मामांनी त्याच्यासाठी गरमागरम वडापाव आणले. "अरे, इतक्या पावसात निघालोय, गोव्याला पोहोचायला उशीर होईल," लहान मामा म्हणाले. मोठ्या मामांनी मान डोलावली. पण सागरला काळजी नव्हती. आजोबा, आजी, मावशी, लहान भाऊ-बहिणी या सगळ्यांना भेटायची उत्सुकता होती.

रात्रीचे जवळपास साडेनऊ वाजले असतील. बस अर्नाळ्याच्या घाटात शिरली होती. घाटातला पाऊस जणू अधिकच धुंद करणारा होता. बाहेर काळोख आणि धुकं. अचानक बसचा वेग मंदावला. क्षणार्धात ब्रेक लागले आणि गाडी जोरात थांबली. सीटवरून पुढे सरकलेल्या सागरने मान वर करून पाहिलं. समोर पोलिसांची जीप होती. लाल-निळे दिवे लखलखत

होते. पावसाच्या पडद्यातून ते दिवे एक विचित्र भास निर्माण करत होते. "काय रे?" मोठे मामा खिडकीतून बाहेर पाहू लागले.

दोन पोलिस बसमध्ये चढले. ड्रायव्हरशी काहीतरी बोलले. ड्रायव्हरचा चेहरा पांढराफटक पडला. एका पोलिसाने पुढे येत सांगितलं, "कोणीही घाबरू नका. आम्हाला एका व्यक्तीचा शोध आहे. ड्रग्ज तस्करीचा संशय आहे. काही प्रवाशांच्या बॅगा तपासाव्या लागतील." गाडीत एकच खळबळ उडाली. सागरच्या पोटात गोळा आला. ड्रग्ज? म्हणजे अमली पदार्थ? तो फक्त सिनेमात बघितलेल्या गोष्टी. इथे प्रत्यक्षात घडत होत्या. पोलिस सीटच्या पंक्तीतून मार्ग काढत पुढे येत होते. मधेच एका सीटजवळ थांबले. तिथे एक तरुण बसला होता. अंगात काळं जाकीट, हातात एक मोठी बॅग. पोलिसांनी त्याची बॅग उघडायला लावली. त्यांचा स्वर वाढला. त्या बॅगेतून काही पाकिटं बाहेर आली. तो तरुण घाबरला. त्याने काहीतरी सांगायचा प्रयत्न केला, पण पोलिसांनी त्याला हाताला धरून बाहेर ओढलं. पावसात भिजत त्या तरुणाला जीपमध्ये बसवलं गेलं आणि पोलीस निघून गेले.

जवळपास अर्धा तास बस तशीच उभी होती. प्रवासी हळूहळू शांत झाले, पण मनातली भीती गेली नव्हती. ड्रायव्हरने गाडी सुरू केली आणि बस पुन्हा गोव्याच्या दिशेने निघाली. सागरने मामांकडे पाहिलं. "घाबरू नकोस, असं कधी कधी होतं," लहान मामा म्हणाले, पण त्यांच्याही चेहऱ्यावर ताण होता. सागरने विचार केला, आत्तापर्यंत ही बस, हा पाऊस, ही रात्र, यात एक वेगळंच गारूड होतं, पण आता या सगळ्यात एक धडकी भरली होती. तरीही, काही वेळाने बाहेरच्या पावसाच्या आवाजाने आणि गाडीच्या हेलकाव्याने त्याला झोप लागली.

अचानक गाडीच्या हॉर्नने त्याला जाग आली. रात्रीचा एक वाजला होता. बस एका गावठी हॉटेलसमोर थांबली होती. पत्र्याचं शेड, पिवळसर दिवे, आणि समोर चहा-कॉफीचं मोठं बोर्ड. हॉटेलच्या बाजूला एक छोटंसं

दुकान होतं. तिथे काचेच्या कपाटात कॅसेट्स लावलेल्या होत्या. "उतरा, जेवणासाठी अर्धा तास थांबा," ड्रायव्हरने ओरडून सांगितलं. सगळे उतरू लागले. सागर उतरला तेव्हा पायाखाली चिखल होता. हवेत मातीचा सुवास आणि गरम जेवणाचा वास दरवळत होता. इथला पाऊस थोडा कमी झाला होता, पण अधूनमधून सरी येत होत्या.

हॉटेलमध्ये बसून सागरने मामांसोबत जेवण केलं. गरमागरम दाल राईस, पनीर मसाला रोटी आणि तळलेला मसाला पापड. पोटभर जेवून झाल्यावर त्याची नजर त्या कॅसेटच्या दुकानाकडे गेली. तो हळूच तिथे गेला. काचेच्या कपाटात '१९४२: अ लव्ह स्टोरी' या चित्रपटाची कॅसेट दिसली. कव्हरवर अनिल कपूर आणि मनिषा कोईराला होते. सागरने काही दिवसांपूर्वीच हा सिनेमा पाहिला होता. "एक लडकी को देखा तो ऐसा लगा," "रूठ ना जाना," आणि "कुछ ना कहो," ही गाणी त्याला खूप आवडली होती. त्याने मामांना हट्ट करून ती कॅसेट विकत घ्यायला लावली. ती कॅसेट हातात घेतल्यावर सागरला खूप आनंद झाला. दुकानदाराने एक छोटी प्लास्टिकची पिशवी दिली. सागरने काळजीपूर्वक ती आपल्या खिशात ठेवली. पुन्हा बसमध्ये बसल्यावर त्याने लगेचच त्याच्या सोनी वॉकमनमध्ये ती कॅसेट टाकली. हेडफोन कानावर लावले आणि प्ले बटण दाबलं.

खिडकीबाहेर अंधार आणि अधूनमधून लखलखणारी वीज. कानात "एक लडकी को देखा..." हे गाणं वाजू लागलं. त्या संगीताने आणि गाण्याने सागर वेगळ्याच दुनियेत पोहोचला. रात्रीच्या प्रवासाचा थकवा, तो पोलिसांचा प्रसंग, भीती, सगळं विसरून तो फक्त गाण्यात हरवला. गाण्याचे बोल, आर.डी. बर्मनचं संगीत, कुमार सानू आणि कविता कृष्णमूर्तीचे आवाज, या सगळ्याने त्याला एक वेगळीच शांतता दिली. बसमधले बाकीचे प्रवासी झोपले होते. सागरचे दोन्ही मामाही घोरत होते.

बाहेर पाऊस पुन्हा जोरात कोसळू लागला. आकाशातून विजा चमकत होत्या आणि ढगांचा गडगडाट होत होता. या निसर्गाच्या प्रचंड आवाजात सागरच्या वॉकमनचं मंद संगीत एक सुरक्षित कोश निर्माण करत होतं.

कॅसेटची एक बाजू संपली तेव्हा सागरने दुसरी बाजू लावली. "कुछ ना कहो, कुछ भी ना कहो..." हे गाणं सुरू झालं. डोळ्यासमोर सिनेमातली दृश्यं तरळत होती. पहाड, दऱ्या, धुकं आणि पाऊस. समोरचं वास्तव आणि कानातलं स्वप्न एकरूप होत होतं. या सगळ्यात त्याला कधी डुलकी लागली ते कळलंच नाही.

पहाटेचे पाच वाजले असावेत. खांद्यावरच्या हाताने त्याला जाग आली. "उठ सागर, पाली आलं," लहान मामा म्हणत होते. सागरने गडबडीत वॉकमन बंद केलं, हेडफोन काढले. गोव्यातल्या पाली गावात बस थांबली होती. पहाटेचा मंद प्रकाश पसरला होता. पाऊस थांबला होता. हवेत एक ताजेपणा होता. चिखलातून वाट काढत ते तिघे उतरले. मामांनी बसमधून बॅगा काढल्या. बस निघून गेली. आता गाव अगदी जवळ होतं.

चालताना सागरने पाहिलं, खिशात कॅसेटची प्लास्टिक पिशवी होती. पण आत काहीतरी जड आहे असं वाटलं. त्याने पिशवी उघडून पाहिली. आत कॅसेटच्या बॉक्ससोबत एक काळ्या रंगाची, हातात नीट बसणारी वस्तू होती. क्षणभर त्याला काहीच कळलं नाही. ती एक छोटी पिस्तूल होती. हॉटेलमधल्या दुकानदाराने चुकून ती पिशवी दिली असावी का? पण एवढी वेगळी वस्तू चुकून कशी येईल? एक विलक्षण विचार त्याच्या मनात चमकून गेला. बस पोलिसांनी पकडली तेव्हा... तो तरुण... दुकानदार... कदाचित हे त्याचंच ठिकाण होतं. कॅसेटच्या आडून काहीतरी दिलं-घेतलं जात असावं.

सागरची नजर वळली. तिथून काही अंतरावर, धुक्यात, एक माणूस उभा होता. त्याने अंगात काळं जाकीट घातलं होतं. तो पावसाळी पहाटेच्या

मंद प्रकाशात स्थिर उभा होता. तो सागरकडेच पाहत होता. सागरच्या पाठीवर शहारा आला. आता तो काहीही बोलला नाही. त्याने घाईघाईने ती वस्तू पुन्हा खिशात ठेवली. मामांनी हाक मारली, "चल रे, काय बघतोयस? घरी चल." सागरने मान हलवली आणि तो मामांच्या मागे निघाला. पण त्याच्या मनात आता गाणी नव्हती, तर त्या पिस्तूलचं थंड वजन आणि धुक्यात उभ्या त्या सावलीची जाणीव होती. गाव चं प्रेम, सुट्टीचा आनंद, या सगळ्यावर त्या काळ्या वस्तूची सावली पडली होती. गोव्याच्या त्या शांत पहाटेला एक भयानक गुपित त्याच्या खिशात शिरलं होतं..

5 बकुळा AI

सांगोल्याच्या तप्त जमिनीवर पाऊस म्हणजे केवळ पाणी नसतं; तो एक सण असतो, एक आश्वासन असतं. त्याच खळगी भरलेल्या रस्त्यांवर खेळणारी, रानात वडाच्या पारंब्यांशी हितगुज करणारी अवनी आता सांताक्लारा, कॅलिफोर्नियाच्या चकचकीत काचेच्या इमारतीत उभी होती. 'निओस्ट्रेटोस AI' कंपनीच्या लोगोखाली तिच्या छातीवरचं 'डेटा सायंटिस्ट' नावाचं कार्ड लटकत होतं, पण मन मात्र तिच्या सांगोल्याच्या कोरड्या पडलेल्या बोरीभोवती घुटमळत होतं.

"अवनी, तुझं 'बकुळा' मॉडेल प्रोडक्शन डिप्लॉयमेंटसाठी रेडी आहे. ग्लोबल सॅटेलाइट डेटा, ओशन करंट सिम्युलेशन्स, अगदी आयसोटोप डिस्ट्रिब्युशनपर्यंत सगळं प्रोसेस झालंय. अक्युरसी ९७.८ टक्के आहे. टुमॉरो बोर्ड मिटींगमध्ये फायनल प्रेझेंटेशन आहे," टीम लीड मार्कने हातातला कॉफीचा स्टारबक्सचा कप उंचावत अभिनंदन केलं. अवनीने हलकं स्मित केलं. "मार्क, पण मला एक अजून रीजनल डेटा सेट फिड करायचाय. इंडियातल्या काही स्पेसिफिक ड्रॉट प्रोन एरियाचा." मार्कने भुवया उंचावल्या, "शुअर, पण 'बकुळा' जेव्हा मान्सून पॅथ प्रेडिक्ट करू शकतं, तेव्हा त्या छोट्या पॉकेट्समध्ये काय अडकली आहेस? युवर डेडलाइन इज टुमारो."

'बकुळा'. हे नाव तिनेच सुचवलं होतं. सांगोल्याच्या बाजारात आजीने सांगितलेली कथा आठवली. बकुळा नावाचं एक पौराणिक पक्षी असं मानतात की त्याच्या दर्शनानं आणि आवाजानं पाऊस नक्की येतो. जुन्या लोकांचा तो खास इंडिकेटर होता. पण अवनीचं बकुळा मात्र क्लाऊड कंप्युटिंगवर तयार झालेलं अल्गोरिदम होतं. मायक्रोसर्व्हिसेस, API कॉल्स

आणि सिंथेटिक डेटाने भरलेलं. तिला वाटलं, जगभरातला प्रत्येक डेटा पॉइंट घेऊन हे मॉडेल तिच्या गावची तहान भागवू शकेल. पण परवा रात्री रन केलेल्या रिग्रेशन टेस्टमध्ये एक विचित्र एरर आली. 'बकुळा' संपूर्ण ग्रहाचं पर्जन्यमान सांगू शकत होतं, पण सांगोल्याच्या पश्चिमेकडच्या पाटाच्या मळ्याजवळ नेमका पाऊस कधी पडेल, हे मात्र सांगू शकत नव्हतं. तिथे डेटामध्ये एक कायमस्वरूपी 'नॉइज' येत होता, ज्याला तिचं शुद्ध गणित समजू शकत नव्हतं.

मार्कच्या डेडलाइनचा दबाव पाठीवर होता, पण अवनीच्या मनातलं वादळ अधिक गडद होतं. तिने सुट्टी मंजूर करून घेतली आणि सांगोल्याला यायचं ठरवलं. सांताक्लाराच्या निळसर प्रकाशात आणि वातानुकूलित हवेत राहणारी अवनी, पंढरपूर रोडवरच्या उन्हाने आणि धुळीने भरलेल्या वास्तवात उतरली. लँडस्केप पूर्णपणे बदललं होतं. स्टारबक्सच्या कडक कॉफीची जागा आता पाटावरच्या कच्च्या कडुनिंबाच्या वासाने घेतली होती. पायात स्नीकर्स ऐवजी जुन्या चपला चढवत ती पाटाच्या मळ्याकडे निघाली. तिचे आजोबा, दादा, अजूनही तिथल्या माळरानावर बांध बांधत होते. "अगं आवंदा, कव्वा आलीस गं? तुझं परदेशातलं गणित मांडलंस का बरं व्हय?" दादांनी डोक्यावरचं गमछं कपाळावर पुसत विचारलं. अवनीला हसू आलं. "होय दादा, पन आपल्या मळ्याचं उत्तर मात्र सापडलं नाय." दादा हसले, "बाई गं, ते उत्तर तुझ्या यंत्रात कुठं भेटणार? चल, दाखवतो तुला."

दादा तिला शेताच्या बांधावर घेऊन गेले. "ह्यो बघ तिथं वडाच्या पारंबीकडे. ती रानपारव्याची जोडी तिकडं घरटं बांधून राहिलीया. ह्यो चातक पक्षी आन् ती पारवी. जर तिनं घरटं नदीच्या दिशेनं पाठ करून बांधलं, तर समजा की यंदा पाऊस लवकर हाय. आन् ह्यो बघ बाभळीच्या खालची माती. येका आठवड्यात जमिनीतून धग यायला लागली, तर

बरसात आठ दिवस दूर समजा. तुमच्या कंपूटरला हे कळतंय का? आनि काल रात्री मुंगळ्यानी अंडी उचलून वरच्या ढिगात नेली, म्हंजे जोराचा पाऊस येणार हे आम्हाला कळतं. ही गुपितं आमच्या हाडांमाजी भिनलीत." दादा बोलत होते आणि अवनीच्या मेंदूतला डेटा सायंटिस्ट जागा झाला. हा सगळा स्ट्रक्चर्ड अनस्ट्रक्चर्ड डेटा होता! रानपारव्याची नेस्टिंग पॅटर्न, मातीचं स्पेसिफिक थर्मल रेडिएशन, मुंग्यांचं बायोमेट्रिक बिहेवियर. हा डेटा कोणत्याच ग्राउंड स्टेशनने रेकॉर्ड केला नव्हता. मातीतला बुरशीचा गंध, पानाच्या पाठीवरचा बारीक ओलावा, पक्ष्यांच्या पंखांची लय हा डेटा फक्त इथे, या मातीच्या सानिध्यात राहूनच कॅप्चर होऊ शकतो. तिच्या 'बकुळा' मध्ये पृथ्वीच्या कक्षेबाहेरून गोळा केलेला डेटा होता, पण पृथ्वीच्या कुशीत डोकं घालून जगणाऱ्या माणसांची 'डोमेन नॉलेज' नव्हती.

ती पुन्हा सांताक्लाराला परतली. मार्क चिडला होता, "बकुळा फेल झालं सांगोल्यात, बट व्हाय? तू डिप्लॉयमेंट लेट केलंस." अवनी शांत होती. तिने मोठ्या स्क्रीनवर कोडिंग सुरू केलं. "मार्क, आपण सगळं जग जिंकायला निघालो, पण पायाखालची माती विसरलो. बकुळा फक्त एक पक्षी नाहीये, ती एक इकोसिस्टम आहे." तिने 'बकुळा'च्या अल्गोरिदममध्ये एक नवीन लेयर ॲड केलं: "इंडिजिनस नॉलेज न्यूरल नेटवर्क". रानपारव्याचा डेटा, मातीची धग, पानांचा फडफड आवाजाचं स्पेक्ट्रल ॲनालिसिस हे सगळं सिंबॉलिक रिग्रेशनने मॉडेलमध्ये बसवलं. काही एन्व्हायरमेंटल साउंड क्लिप्स ट्रेन केल्या. बोर्ड मीटिंगमध्ये तिने जगासमोर एक नवीन थिअरी ठेवली: "जागतिक हवामानाचं कोडं उलगडायला सॅटेलाइट पुरेसा नाही, तिथल्या मुंग्यांची भाषा समजायला हवी." प्रोजेक्ट सुपर-हिट झालं. पण अवनीसाठी खरं यश ते नव्हतं. तिला आता फरक पडत नव्हता शेअर प्राईसचा. तिने पगारातल्या पैशातून सांगोल्यासाठी सजीव वारसा डेटाबँक तयार करायचा निर्णय घेतला. कारण तिला कळलं होतं, सांताक्लाराचे सर्व्हर कधीच सांगोल्याच्या पावसाचा

अंदाज लावू शकत नाहीत, जोपर्यंत तिथल्या मातीत पाय रोवून, डोळे भरून तो अनुभव घेतला जात नाही. तिच्या लॅपटॉपवर आता 'प्रॉम्प्ट' ऐवजी दादांची अखेरची ओळ चमकत होती: "पाऊस आला रे आवंदा, पाऊस आला...!

6 सत्याचा क्षण

तळेगाव शिवारातलं कोकण कडेकडेपर्यंत पसरलेलं हिरवं गालिच्यासारखं दिसत होतं. पावसाळा नुकताच सुरू झाला होता. भाताची रोपं लावायला गावकरी सज्ज झाले होते. पण यंदाचं वातावरण काही वेगळंच होतं. ग्रामपंचायतीची निवडणूक डोक्यावर आली होती. दोन गट आमने-सामने उभे होते – एकीकडे पंधरा वर्षांचा सरपंच असलेले मामासाहेब पाटील आणि दुसरीकडे गावातली नवी पिढी म्हणून उभे राहिलेले सिद्धेश देसाई, ज्यांना सगळे 'सिद्धूभाऊ' म्हणायचे.

सिद्धूभाऊ बाहेरगावी इंजिनिअरिंग करून आले होते. गेल्या दोन वर्षांपासून त्यांनी गावात शेतकरी उत्पादक कंपनी सुरू केली होती. सेंद्रिय शेती, पाण्याचं नियोजन, बाजारपेठेशी थेट संपर्क – या गोष्टींमुळे तरुणाई त्यांच्या पाठीशी होती. पण मामासाहेबांची पकड मात्र जुन्या माणसांवर, साखर कारखान्याच्या राजकारणावर आणि जातीय समीकरणांवर होती.

निवडणुकीच्या आदल्या रात्रीची वेळ. सिद्धूभाऊ आपल्या घरच्या पडवीत बसून शेवटच्या प्रचारसभेची तयारी करत होते. त्यांचा लहान भाऊ ओंकार, जो नुकताच पुण्याहून कॉम्प्युटर सायन्समध्ये पदवी घेऊन आला होता, त्याच्या लॅपटॉपवर काहीतरी काम करत बसला होता.

"दादा, एकदा हे बघा," ओंकारने लॅपटॉपचा पडदा दाखवला.

सिद्धूभाऊंनी मान वर करून पाहिलं. पडद्यावर एक व्हिडिओ सुरू होता. त्यात सिद्धूभाऊ एका बाईबरोबर अश्लील स्थितीत दिसत होते. त्यांच्या तोंडून शिव्या आणि दारूच्या बाटल्या. सिद्धूभाऊंच्या अंगावर काटा आला.

"हा व्हिडिओ तू कुठून आणलास? हे मी नाहीये! हा मी नाहीच मुळी!" सिद्धूभाऊ ओरडले.

"मला माहितीये दादा, हा मी नाही. पण हा व्हिडिओ आत्तापर्यंत गावातल्या प्रत्येक व्हॉट्सॲप ग्रुपवर पोहोचला आहे. हा डीपफेक आहे. AI ने बनवलेला. तुमचा चेहरा दुसऱ्या कुणाच्या तरी शरीरावर बसवला आहे."

सिद्धूभाऊंच्या हातातला कागद खाली पडला. गावातल्या गल्ल्यांमधून हास्याचे, टीकेचे, शिव्यांचे आवाज येऊ लागले. काही तरुण मुलं त्यांच्या घरासमोरून जाताना मोबाईलवर तोच व्हिडिओ पाहत होती. सिद्धूभाऊंची आई आतल्या खोलीतून बाहेर आली. तिच्या डोळ्यात पाणी होतं.

"सिद्धू, असं कसं रे? माझ्या लेकराला मी जन्मापासून पाहिलंय. हा माझा सिद्धू नाही. पण हे गाव मला कसं समजावणार?"

सिद्धूभाऊंनी ओंकारकडे पाहिलं. "तुला सिद्ध करता येईल का की हा बनावट आहे?"

ओंकारने मान हलवली. "करता येईल दादा. पण त्यासाठी दोन दिवस लागतील. निवडणूक संपेपर्यंत काही उपयोग नाही. आणि खरं सांगू का, या गावातल्या लोकांना तुझं सत्य ऐकायचंच नाहीये. त्यांना जे हवं ते दिसतंय."

दुसऱ्या दिवशी सकाळी सात वाजता गावातली दुसरी बातमी पसरली. राघोबा कांबळे यांनी विहिरीत उडी मारून आत्महत्या केली. गाव हादरलं. राघोबा हे पन्नास वर्षांचे गरीब शेतकरी. दोन एकर कोरडवाहू शेती. त्यांचा मुलगा नितीन दहावीत होता. मुलीचं लग्न ठरलं होतं.

राघोबांच्या पत्नी सुमनबाई ढसाढसा रडत होत्या. "काल रात्री बँकेचा फोन आला होता. कर्ज फेडलं नाही तर जमीन जप्त करू, अशी धमकी दिली. तो म्हणाला, 'उद्या सकाळी बँकेची माणसं येतील.' त्या भीतीने हे केलं बघा."

गावकरी जमले होते. कुणीतरी म्हणालं, "पण बँकेचा फोन आला होता हे कसं कळलं? आजकाल हे सगळे फोन फेक असतात. सावकार लोकं बँकेच्या नावाने फोन करून घाबरवतात."

दुसरा कुणी म्हणाला, "अगं, आदल्या आठवड्यात माझ्याकडे पोलिसांचा फोन आला होता. मुलगा अडचणीत आहे, पैसे पाठवा म्हणून. मी नाही पाठवले. निघाला फेक."

सुमनबाईंच्या डोळ्यातलं पाणी आता रागाने लखलखलं. "म्हणजे राघोबाने घाबरून जीव दिला, आणि तुम्ही म्हणता तो फोन खोटा होता? तुमच्या लेकराच्या आयुष्याशी खेळ झाला असता तर कळलं असतं!"

तिचा मुलगा नितीन जवळच उभा होता. त्याच्या चेहऱ्यावर निर्विकार भाव होता. त्याने खिशातून बापाचा जुना कीपॅड मोबाईल काढला आणि म्हणाला, "काल रात्री १० वाजून ३७ मिनिटांनी आलेला फोन. मी रेकॉर्डिंग ऐकलं. बँकेच्या मॅनेजरचाच आवाज होता. मी आज सकाळी बँकेत चौकशी केली. तो फोन खरा होता. बँकेने खरंच कर्ज वसुलीसाठी धमकी दिली होती."

गर्दीत शांतता पसरली. सगळ्यांच्या तोंडचं पाणी पळालं.

सिद्धूभाऊ निवडणुकीच्या मैदानातून बाहेर पडले. त्यांच्या डोक्यात एकच विचार घोळत होता. मामासाहेबांनी बनवलेला खोटा व्हिडिओ खरा

मानला गेला. कारण लोकांना तो खरा वाटला. आणि राघोबांना आलेला बँकेचा खरा फोन खोटा मानला गेला. कारण लोकांना तो खोटा वाटला.

सिद्धूभाऊ राघोबांच्या घराच्या अंगणात पोहोचले. सुमनबाई रडून रडून थकल्या होत्या. सिद्धूभाऊंनी तिच्या हातात पंचवीस हजार रुपये ठेवले. "ही मदत नाही, तर माझं कर्तव्य आहे. काल माझ्याबद्दल खोटा व्हिडिओ व्हायरल झाला आणि सगळ्यांनी खरा मानला. आज तुमच्या नवऱ्याला खरा फोन आला आणि सगळ्यांनी खोटा मानला. या दोन्ही गोष्टींमध्ये एक समान धागा आहे – आपण सगळ्यांनी ठरवून टाकलंय की खरं काय आणि खोटं काय, हे आपणच ठरवायचं. सत्य ही वैयक्तिक चॉईस झाली आहे."

नितीनने मान वर करून सिद्धूभाऊंकडे पाहिलं. "पण सिद्धूभाऊ, ज्या दिवशी सत्य ही निवड होते, त्या दिवशी न्याय कसा मिळणार?"

सिद्धूभाऊंकडे उत्तर नव्हतं.

संध्याकाळी निवडणुकीचा निकाल लागला. मामासाहेब १७२ मतांनी जिंकले. सिद्धूभाऊ हरले. पण ते हरले ते निवडणुकीपेक्षा मोठ्या युद्धात. जिथे खोटं खरं होतं आणि खरं खोटं. जिथे तंत्रज्ञानाने सत्याचा चेहराच बदलून टाकला होता.

ओंकारने रात्री दादाला विचारलं, "दादा, मी उद्या त्या व्हिडिओचं डिजिटल विश्लेषण करून सिद्ध करतो की तो बनावट आहे. मग आपण कोर्टात जाऊ."

सिद्धूभाऊ हसले. "कशासाठी? काल राघोबा जिवंत होते. त्यांना न्याय हवा होता. पण तो मिळाला नाही. माझा व्हिडिओ खोटा होता, हे

सिद्ध करून मला काय मिळणार? सत्ता गेली, ते गेलं. पण माणसांचा एकमेकांवरचा विश्वास गेला, तो परत कसा येणार?"

दुसऱ्या दिवशी पेपरमध्ये बातमी आली – "डीपफेक व्हिडिओने हादरला तळेगावचा निवडणूक प्रचार; बँकेच्या धमकीने शेतकऱ्याची आत्महत्या."

पण या बातमीखाली कुणीतरी कमेंट केली होती – "सिद्धूभाऊंचा व्हिडिओ खरा की खोटा, यापेक्षा त्यांनी राजीनामा द्यायला हवा. कारण लोकांचा विश्वास संपला."

त्याच बातमीच्या दुसऱ्या बाजूला लिहिलं होतं – "राघोबा कांबळे यांना श्रद्धांजली. पण बँकेचा फोन खरा होता की खोटा, याची चौकशी सुरू आहे."

बातमी वाचून सिद्धूभाऊंना हसू आलं. खोटा व्हिडिओ 'खरा' ठरवण्यासाठी कोणतीही चौकशी लागली नाही. पण खऱ्या फोनसाठी मात्र 'चौकशी सुरू आहे'.

सिद्धूभाऊंनी ओंकारला जवळ बोलावलं. "ओंकार, आपण एक छोटं सॉफ्टवेअर बनवूया. जे गावातल्या प्रत्येक फोनवर असेल. जे प्रत्येक व्हिडिओ, प्रत्येक मेसेज, प्रत्येक फोन कॉल सत्यापित करेल. खरं-खोटं ओळखण्याचं एक साधन."

"पण दादा," ओंकार हळूच म्हणाला, "जर लोकांनाच सत्य जाणून घ्यायचं नसेल, तर हे सॉफ्टवेअर काय करेल?"

सिद्धूभाऊंनी बाहेर अंधारात हरवलेल्या डोंगररांगांकडे पाहिलं. "तेव्हा आपण माणसांना विचारू – तुम्हाला सत्य हवंय की सोयीचं खोटं? कारण

तंत्रज्ञानाने सत्य आणि खोटं यांच्यातली रेषाच पुसून टाकली आहे. आता ती रेषा पुन्हा रेखाटण्याची जबाबदारी आपली आहे. माणसाची."

दूर कोठेतरी कुत्रा रडला. रात्रीचं वारं शांत होतं. तळेगाव झोपलं होतं. पण सत्य झोपलं नव्हतं. ते जागं होतं. कोणीतरी हाक मारून विचारावं, याची वाट पाहत होतं.

7 देवी

कैलासगडाच्या पायथ्याशी असलेल्या निर्जन गावात, पंधरा वर्षांचा गौतम आपल्या आईवडिलांसोबत राहत होता. त्याचे वय लहान असले तरी त्याचे मन मात्र नेहमीच विचारमग्न असे. गावाच्या पश्चिमेला उंच डोंगरावर एक प्राचीन मंदिर होते – देवी भवानीचे मंदिर. गावकरी वर्षातून एकदा नवरात्रालाच तिथे जात. बाकी वेळी ते मंदिर ओसाड पडलेले असे. गौतमला लहानपणापासून त्या मंदिराची अजब ओढ वाटत असे. तो डोंगराच्या पायथ्याशी बसून वरच्या मंदिराकडे तासन्तास पाहत राही.

एक दिवस, वैशाख महिन्याच्या तिसऱ्या दिवशी, गौतमने निश्चय केला. तो पहाटेच घर सोडून निघाला. उन्हाळ्याचा कडक ऊन असतानाही तो त्या खडकाळ वाटेने चालू लागला. पाय भाजत होते, घसा कोरडा पडत होता, पण त्याच्या डोळ्यांसमोर फक्त एकच ध्येय होते – देवीचे दर्शन. सूर्य माथ्यावर येईपर्यंत तो मंदिरापाशी पोहोचला. ते मंदिर अत्यंत पुरातन होते. काळ्या पाषाणात कोरलेली देवीची मूर्ती, भोवती निवांत शांतता, फक्त सोसाट्याचा वारा आणि गिधाडांच्या किंकाळ्या.

गौतमने देवीसमोर दंडवत घातला. त्याच्या मनात एक विचित्र भावना दाटून आली. त्याने ठरवलं – इथून पुढे पाऊल उचलायचं नाही, जोपर्यंत देवी प्रसन्न होत नाही. पहिला दिवस गेला, दुसरा दिवस गेला. भूक लागली तरी त्याने पाण्याचा एक थेंबही घेतला नाही. तिसऱ्या दिवशी शरीर थकून गेले. डोळ्यांसमोर अंधारी दाटू लागली. पण तो स्थिर बसून राहिला. रात्रीच्या वेळी जंगली श्वापदांच्या हाका ऐकू येत, पण गौतमच्या मनात भीती नव्हती.

चौथ्या दिवशी त्याला भास होऊ लागले. कधी वाटे देवी हसते आहे, कधी वाटे कुणीतरी त्याच्या कानाजवळ येऊन मंत्र म्हणते आहे. पाचव्या दिवशी त्याचे शरीर जणू दगड झाले. श्वासोच्छवास अतिशय मंद झाला. सहाव्या दिवशी त्याला बाहेरचे जग दिसेनासे झाले. फक्त एका तेजस्वी प्रकाशाची अनुभूती येत होती. सातव्या दिवशी त्याच्या कानात सहस्र घंटांचा नाद घुमू लागला. आठव्या दिवशी तो देहभान विसरला. नवव्या दिवशी त्याचे मन एका अगम्य शून्यात विलीन झाले. आणि दहाव्या रात्री...

त्या रात्री आकाशात ढग गर्जत होते, विजा चमकत होत्या. पावसाचा एक थेंबही पडला नव्हता. गौतम अर्धमूर्छित अवस्थेत पडला होता. अचानक वारा थांबला. ढगांचा गडगडाट शमला. एक अनामिक सुगंध वातावरणात पसरला. गौतमचे डोळे मिटलेलेच होते, पण त्याला जाणवले की समोर कोणीतरी उभे आहे. एक तेजस्वी स्त्रीरूप. अंगावर लाल वस्त्र, कपाळावर सिंदूर, डोळ्यांमध्ये करुणा आणि पराक्रमाचा अद्भुत मिलाफ. तिने हळूच गौतमच्या डोक्यावर हात ठेवला.

"उठ गौतमा," आवाज आला. तो आवाज स्वर्गातून येत असल्याचा भास झाला. गौतमने डोळे उघडले. समोर खुद्द देवी दुर्गा उभी होती. सिंहावर आरूढ, अष्टभुजा, प्रत्येक हातात आयुधे. तिच्या तेजाने अवघे मंदिर उजळून गेले. गौतम काही बोलू शकला नाही. डोळ्यांतून अश्रू वाहू लागले. देवीने स्मित केले.

"तुझ्या तपस्येवर मी प्रसन्न झाले आहे. तुझ्या जीवनाचे प्रयोजन वेगळे आहे. तू फक्त स्वतःच्या मोक्षासाठी जन्माला आला नाहीस. तू समाजातील अंधार दूर करण्यासाठी, पीडितांच्या रक्षणासाठी जन्माला आला आहेस. जा, संन्यास घे. तुझे नाव आजपासून सुमेधानंद. तुझ्या हातून अनेकांचे कल्याण होईल. तुला कोणी हरवू शकणार नाही, कारण मी स्वतः तुझ्या पाठीशी आहे."

एवढे बोलून देवी अदृश्य झाली. गौतमच्या शरीरात एक विलक्षण उर्जा संचारली. दहा दिवस उपाशी असूनही तो तरुण ताठ उभा राहिला. त्याच्या डोळ्यांत वेगळेच तेज होते. तो खाली गावात गेला तेव्हा सगळे चकित झाले. त्याने आपल्या आईवडिलांना नमस्कार केला आणि सांगितले, "आता मी फक्त तुमचा मुलगा नाही. देवीने मला एका मोठ्या कार्यासाठी निवडले आहे. मला आशीर्वाद द्या."

आईवडिलांना धक्का बसला, पण मुलाच्या डोळ्यांतील तेज पाहून ते नकार देऊ शकले नाहीत. गौतमने भगवे वस्त्र परिधान केले. डोक्यावर शेंडी ठेवली. गळ्यात रुद्राक्ष घातले. तो आता गौतम नव्हता, तो होता सुमेधानंद स्वामी.

सुमेधानंद स्वामींनी भारतभर भ्रमण सुरू केले. काशी, प्रयाग, उज्जैन, कांचीपुरम अशी अनेक तीर्थक्षेत्रे पायी पालथी घातली. ते जिथे जात, तिथे लोकांना प्रवचन देत. त्यांच्या वाणीत अद्भुत माधुर्य होते. शास्त्रांचे ज्ञान होते. पण सर्वात महत्त्वाचे म्हणजे देवीची कृपा त्यांच्यावर होती. त्यांच्या स्पर्शाने रोग बरे होत. त्यांच्या वचनाने मनातील भय नाहीसे होत.

एकदा ते दक्षिणेकडून परत येत असताना कोल्हापूरजवळ आले. तिथे अंबाबाईचे प्रसिद्ध मंदिर आहे. त्या मंदिराच्या परिसरातच एका धनाढ्य सावकाराने एक भव्य यज्ञ आयोजित केला होता. दूरदूरचे पंडित, साधू, विद्वान तिथे जमले होते. यज्ञाचा धूर आकाशात पसरत होता. मंत्रांचा घोष चालू होता. सुमेधानंद स्वामी तिथे पोहोचले. त्यांचे भगवे वस्त्र पाहून सर्वांनी त्यांना मान दिला .

पण यज्ञमंडपात पाऊल ठेवताच स्वामींना काहीतरी विचित्र जाणवले. त्यांच्या अंतरात्म्याला एक तीव्र सूचना मिळाली. हा यज्ञ साधा नव्हता. वातावरणात एक काळी, जड ऊर्जा पसरली होती. मंत्र तर वैदिक होते, पण त्यांचा उच्चार विकृत होता. स्वामी यज्ञमंडपाभोवती फिरू लागले. त्यांची

दृष्टी एका पंडितावर खिळली. तो पंडित इतरांपेक्षा वेगळा होता. त्याचे डोळे लाल होते. कपाळावर विचित्र काळे टिळे होते. त्याच्या आवाजात एक अजब खोली होती. तो मंत्र म्हणताना त्याच्या हातातील कुशाची हालचाल इतरांपेक्षा उलटी होती. स्वामी समजले – हा माणूस सामान्य पंडित नव्हता, तो एक अघोरी तांत्रिक होता. काळ्या जादूचा उपासक.

स्वामींनी यज्ञयजमानाला विचारले, "हा यज्ञ कशासाठी होत आहे?" यजमान म्हणाला, "महाराज, माझा मुलगा गेल्या तीन वर्षांपासून आजारी आहे. वैद्यांनी हात टेकले. या पंडितजींनी सांगितले की एका महायज्ञाने सर्व दोष दूर होतील." स्वामींनी विचारले, "यज्ञाच्या अखेरच्या दिवशी काय होणार आहे?" यजमान काहीच बोलला नाही. स्वामींना संशय आला. ते रात्री गुप्तपणे यज्ञमंडपाच्या मागे गेले. तिथे त्यांनी काय पाहिले, ते पाहून त्यांच्या अंगाचा थरकाप उडाला. एका लहान बालिकेला बांधून ठेवले होते. तिच्या अंगावर हळद लावली होती. तिला बळी देण्याची तयारी सुरू होती. हा नरबळी होता. तो पंडित काळ्या जादूने आपली सिद्धी साध्य करण्यासाठी हे सर्व करत होता. मुलगा बरा होण्याच्या बहाण्याने तो एका निष्पाप जिवाचा बळी घेणार होता.

दुसऱ्या दिवशी यज्ञाचा अंतिम विधी सुरू झाला. तो तांत्रिक पंडित आपल्या आसनावर बसला. त्याने आज्ञा दिली की बालिकेला आणा. तेवढ्यात सुमेधानंद स्वामी उठले. त्यांच्या डोळ्यांत अग्नी पेटला होता. त्यांनी हातातील दंड उचलला आणि गर्जना केली, "थांब! हा अधर्म मी होऊ देणार नाही. देवीच्या नावाने, तुला आव्हान देतो, हे काळ्या जादूच्या पुजाऱ्या!"

तांत्रिकाने स्वामींकडे पाहिले. त्याच्या डोळ्यांतून द्वेष ओतप्रोत भरला होता. तो ओरडला, "तू कोण आहेस हा विध्वंस करणारा? माझ्या मार्गात येऊ नकोस, नाहीतर तुझी गत बरी होणार नाही!" स्वामी शांतपणे म्हणाले,

"मी देवी दुर्गेचा सेवक आहे. तुझा काळा जादूचा खेळ आता संपला." एवढे बोलून स्वामींनी हात जोडले आणि डोळे मिटून देवीचा ध्यास धरला. "जय भवानी! जय अंबे!" त्यांच्या मुखातून उद्गार बाहेर पडताच अवघ्या यज्ञमंडपात एक विलक्षण प्रकाश पसरला. त्या प्रकाशाने तांत्रिकाची काळी शक्ती जणू भस्मसात झाली. तांत्रिक जमिनीवर कोसळला. त्याच्या अंगातील बळ गेले. यजमान आणि इतर पंडित घाबरून मागे सरले. स्वामींनी त्या बालिकेचे बंधन सोडले. ती रडत त्यांच्या पाया पडली. स्वामींनी तिला आशीर्वाद दिला.

त्या दिवशी सुमेधानंद स्वामींना जाणवले की देवीने सांगितलेल्या जीवनाचे प्रयोजन त्यांनी पूर्ण केले आहे. एका निष्पाप जिवाचे रक्षण करून त्यांनी आपल्या जीवनाचे सार्थक केले. पण त्यांचे कार्य एवढ्यावरच संपले नाही. त्या घटनेनंतर त्यांची कीर्ती सर्वत्र पसरली. लोक दूरदूरहून त्यांच्याकडे येऊ लागले. काळी जादू, भूतबाधा, चेटूक यांनी पीडित झालेले लोक त्यांच्याकडे येऊ लागले. स्वामी कुणालाही रिकामे पाठवत नसत. ते तांत्रिक विद्येचा वापर करत नसत. फक्त देवीच्या नामाचा जप करत. त्यांच्या भक्तीच्या सामर्थ्याने सर्व काळ्या शक्ती पळून जात. ते म्हणत, "काळ्या जादूवर उतारा म्हणजे देवीवरची अतूट श्रद्धा. हृदयात भय नको, फक्त भवानी मातेचे नाव घ्या."

सुमेधानंद स्वामींनी उर्वरित आयुष्य लोककल्याणासाठी वाहून दिले. कोल्हापूरच्या त्या घटनेनंतर ते कधीच थांबले नाहीत. त्यांनी हिमालयापासून कन्याकुमारीपर्यंत अनेक गावे पालथी घातली. प्रत्येक गावात जाऊन त्यांनी काळ्या जादूच्या विळख्यात सापडलेल्या लोकांना मुक्त केले. ते उपचार करताना कोणतेही तंत्र-मंत्र वापरत नसत. फक्त देवीच्या नावाचा जप करत आणि पीडित व्यक्तीच्या डोक्यावर हात ठेवत. त्यांच्या स्पर्शानेच लोक बरे होत. देवी दुर्गेने त्यांना दिलेल्या आशीर्वादाचे

सामर्थ्य इतके होते की त्यांच्यासमोर कोणतीही काळी शक्ती टिकू शकत नसे.

ते म्हणून गेले, **"जीवनाचे खरे प्रयोजन म्हणजे दुसऱ्याचे दुःख हरण करणे.**

देवीची खरी पूजा म्हणजे निष्पापांचे रक्षण करणे.

हाच खरा धर्म,

हाच खरा मोक्ष."



8 समाधी...

सन 1982.महाराष्ट्र आणि गोवा सीमेवरचा तिल्लारी गाव. तिलारी गावांमध्ये धरणाचे काम जोरात सुरू होते. कर्नाटक आंध्र प्रदेश आणि इतर राज्यातूनही त्या ठिकाणी कामगार आले होते.त्यामध्येच मल्लाप्पा नावाचे कामगार होता. मल्लाप्पा आणि त्याच्याबरोबरचे सहकारी एका दिवशी जमीन खणत होते आणि अचानक एक मोठा काळा पत्थर लागला. महत्प्रयासाने त्यांनी तो काळा पत्थर बाजूला केला आणि खाली पाहतात तर एक जिवंत मनुष्य त्या पत्थरखाली बसलेला होता.

हा प्रकार बघून मल्लाप्पा बेशुद्ध पडायचा बाकी राहिला. घाई घाईने त्यांच्याबरोबर काम करणाऱ्या मंडळींनी सुपरवायझरला बोलवून आणले. त्यावेळी भालचंद्र तेंडुलकर तथा भाऊ हे सुपरवायझर म्हणून तेथे तैनात होते. त्यांच्या साठी देखील हे खूप मोठे आश्चर्य होते. कारण प्रेत म्हणावं तर तो माणूस जिवंत असल्यासारखा भासत होता जो जमिनीखाली सापडला होता. त्या माणसाचे डोळे मिटलेले होते आणि दाढी केस नखं वगैरे वाढलेले होते. भाऊंनी खाली उतरून त्याची नाडी चेक केली आणि श्वासोच्छ्वास पाहिला तर तो मनुष्य जिवंत होता. आता मात्र भाऊंच्या भीतीची जागा आश्चर्याने घेतली.

भालचंद्र भाऊ हे पहिल्यापासून अध्यात्मिक वृत्ती चे असल्याने त्यांनी भारतीय अध्यात्म आणि साधना शास्त्र याबद्दलचे काही पुस्तके वाचलेली होती. त्यामुळे त्यांनी तर्क केला की ही व्यक्ती बहुधा समाधी अवस्थेत असावी. मग भाऊंनी सर्व कामगारांना बाजूला केले आणि कोणालाही काहीही न सांगण्याची तंबी दिली. हातातल्या बाटलीतून थोडेसे पाणी त्यांनी त्या व्यक्तीच्या डोळ्यावर मारले आणि हळूहळू हलवून त्या व्यक्तीला जागे

करण्याचा प्रयत्न करू लागले. एव्हाना संध्याकाळ होत आली होती आणि भाऊंना आपल्या रूमवर परतायचे होते.कारण भाऊ मूळचे रत्नागिरी जिल्ह्यातले परंतु तिलारी प्रकल्पावर नेमणूक झाल्यानंतर ते जवळच्या गावात क्वार्टरमध्ये राहत होते.

साधारण पंधरा मिनीटांनी ती व्यक्ती जागी झाली. भाऊंनी त्यांच्याशी बोलण्याचा प्रयत्न केला . तो "उदक उदक... जल" असे शब्द बोलू लागला. मग आपल्या जवळचे पाणी त्याला प्यायला दिले. तो मनुष्य संस्कृत आणि प्राकृत याच्या आसपास असलेल्या भाषेत काही शब्द उच्चारत होता जे भाऊंना कळत नव्हतं... अगम्य भाषेत तो जे काही बोलला त्याचा साधारण अर्थ भाऊंना कळला तो इतकाच की तो विचारत होता... " हा कोणता काळ आहे?" मग त्याला काय उत्तर द्यावे या विचारात असताना भाऊ नी जवळच्या डायरीत लिहून दाखवलं की कलियुग... शालिवाहन शके 1904... इसवी सन 1982... ते पाहून तो हसला... आणि हातवारे करून सांगू लागला..." अयोग्य समय... अयोग्य समय! "

मग भाऊंना जवळ बोलावून म्हणाला... "मंत्र दीक्षा... मंत्र दीक्षा... " असे म्हणून देवी उपासनेतील एक गूढ मंत्र त्याने भाऊंच्या कानात सांगितला आणि पुन्हा आपल्या समाधीचा काळा पत्थर लावून बंद करण्याचा आदेश हातवारे करून दिला... भाऊंनी त्या समाधीस्त व्यक्तीला नमस्कार केला आणि मलाप्पा आणि इतर कामगारांना समाधी पुन्हा बंद करण्यासाठी सांगितले... काळा पत्थर लावून समाधी बंद केली आणि वर भरपूर माती टाकून कोणाला काही समजणार नाही याची दक्षता घेतली....

घरी गेल्यावर दुसऱ्या दिवशी देवपूजा झाल्यावर भाऊनी त्या मंत्राचा जप सुरु केला आणि काही काळातच त्यांचं भान हरपलं... त्यांना दिव्य दृष्य दिसू लागली ज्यात तो समाधीतला साधू एका मोठ्या कमळावर बसला

होता... साधु म्हणाला "तुझं भाग्य थोर म्हणून तुला माझं दर्शन झालं... पण माझी समाधी सोडायचा वेळ अजून आला नाही... कलियुगात माणूस देव धर्म निती शास्त्र सगळं विसरून सत्ता आणि संपत्तीच्या मागे वेडा होईल आणि या सगळ्याचा कडेलोट होईल तेव्हाच माझी समाधी भंग करून मला माझं कार्य करायचं आहे... बाळा तुला या मंत्राच्या जपाने खूप काही मिळेल... पण कुणाचं काही वाईट करू नकोस कधी...."

ते स्वप्नं संपलं आणि त्यादिवशी कामावर जायला भाऊंना उशीर झाला. दुसऱ्याच दिवशी त्यांना मुंबईवरून फोन आला त्यात त्यांना प्रमोशन मिळाल्या ची आनंदवार्ता मिळाली.... हळूहळू भाऊ त्यांच्या नेहमीच्या कामकाजात व्यस्त झाले पण मंत्रजप मात्र रोज करत होते... 2005 साली ते रिटायर झाले आणि आपल्या रत्नागिरी शेजारच्या लांजा गावी येऊन राहू लागले...

2024

महाभारताच्या युद्धानंतर सर्वत्र शांतता पसरली होती. धर्मयुद्धाची समाप्ती झाली होती, पण धर्म आणि अधर्म यांच्यातील संघर्ष अजूनही जगात चालूच होता. या संघर्षातून सुटका मिळवण्यासाठी अनेक साधू आणि ऋषी समाधी लावून ध्यानात मग्न झाले होते. त्यापैकीच एक होता – महर्षी सुमेधानंद. त्याने एक निर्जन गुहेत आपली समाधी लावली होती, जेव्हा जगावर संकट येईल, तेव्हा आपण जागे होऊ, असा त्याचा निश्चय होता.

काळ लोटला, शतकं बदलली, सम्राट गेले, राज्ये उठली आणि लयास गेली. पण सुमेधानंद आपल्या समाधीमध्ये शांतपणे स्थित राहिले. त्याला

बाहेरच्या जगातील बदलांची कोणतीही कल्पना नव्हती. महाभारताच्या युद्धापासून २१व्या शतकापर्यंतचा काळ भूतकाळातच विलीन झाला होता.

आणि एका दिवशी, २०२३ साली , त्या लहानशा तिलारी गावात नवीन रस्त्याचं बांधकाम सुरू होतं. बऱ्याच वर्षांपासून ही जागा जंगलाच्या आत असल्याने इथं कोणाचं लक्ष गेलं नव्हतं. परंतु आता आधुनिक जगाने त्याचा विस्तार सुरू केला होता. बांधकामाच्या कामात असणाऱ्या कामगारांनी अचानक एका ठिकाणी खोदकाम करताना एक जुनी गुहा उघडली. त्यांना त्याचं विशेष काही वाटलं नाही, पण आतमध्ये काहीतरी गूढ होतं. गुहेत एक साधू शांतपणे समाधीमध्ये बसलेला होता.

विश्वरूपानंद जेव्हा समाधीमधून जागे झाले, तेव्हा त्यांचं मन शांत होतं, पण बाहेरील वातावरण खूप बदललेलं होतं. कामगार भयभीत झाले, पण साधूने त्यांना शांत केलं आणि विचारलं, "हे कोणतं वर्ष आहे? "

कामगारांनाही काही समजत नव्हतं, पण त्यांनी साधूला रस्त्याच्या बाजूला नेलं आणि आसपासच्या आधुनिक वस्तू दाखवल्या. साधू विस्मयाने पाहत होता – गाड्या, मोबाइल, मोठमोठी इमारती, आणि लोकांचं जीवन त्याला परग्रहावरच्या जीवनासारखं वाटत होतं.

विश्वरूपानंद महाराज शहरात आल्यावर गुहेच्या निर्जनतेपासून या आधुनिक जगातील गोंधळ आणि गतीने चकित झाले . त्यानी कधी विचारही केला नव्हता की मानवजात एवढ्या वेगाने प्रगती करेल. त्याला दिसलं की आता लोक वेगवेगळ्या यंत्रांमध्ये बिझी असतात, मनुष्य आपसातील संवाद कमी करून यंत्रांशी जास्त संवाद साधत होता.

त्यानी विचार केला, "या यंत्रांच्या जगात लोकांच्या मनात शांती आहे का? धर्म आणि अधर्म यांच्यातला संघर्ष थांबला आहे का?" तो निरखून बघू लागला. तांत्रिक प्रगती झाली होती, पण लोक अजूनही आनंदाच्या

आणि शांतीच्या शोधात होते. ते वेगवेगळ्या गोष्टींमध्ये अडकलेले दिसत होते – पैसा, प्रसिद्धी, आणि तणाव.

विश्वरूपानंद एका उद्यानात बसले होते . त्याला लोकांच्या चेहऱ्यांवरच्या काळजीच्या रेषा स्पष्ट दिसत होत्या. त्याना जाणवलं की या आधुनिक जीवनशैलीत जितकी प्रगती झाली आहे, तितकाच मानसिक ताण आणि असंतोषही वाढला आहे.

महाराजांनी काही दिवस या शहरात घालवले. त्याने पाहिलं की लोक बाह्य प्रगतीच्या मागे धावत होते, पण त्याच वेळी त्यांचं अंतरंग रिकामं होतं. त्याला समजलं की या युगातही धर्म आणि अधर्म यांच्यातील संघर्ष संपलेला नाही. फक्त त्याचे रूप बदलले होते.

"माझी समाधी अशासाठी नव्हती की मी या जगापासून अलिप्त राहून फक्त ध्यान करावं. आजच्या मानवाला माझी गरज आहे. समाधीचं सत्य आणि आत्मिक शांती या जगाला पुन्हा कळायला हवी."

आता महाराजांनी ठरवलं की या आधुनिक जगात अध्यात्माची ज्योत पुन्हा प्रज्वलित करण्यासाठी भ्रमणयात्रा करायची.लोकांशी संवाद साधण्यास सुरुवात केली, त्यांना ध्यान, योग आणि शांततेचं महत्त्व सांगितलं. हळूहळू, त्याच्या उपदेशामुळे अनेक लोक त्याच्याकडे येऊ लागले.

सुमेधानंदाचं ध्येय स्पष्ट होतं – तांत्रिक प्रगतीसह आत्मिक प्रगती देखील आवश्यक आहे. २१व्या शतकातील या धकाधकीच्या जीवनात मानसिक शांती मिळवण्यासाठी आत्मचिंतन आणि साधनेची गरज आजही तितकीच आहे, जितकी महाभारताच्या काळात होती.

समाधीतील साधूने हजारो वर्षांच्या ध्यानातून बाहेर येत नव्या जगाची अनुभूती घेतली. त्याला बाहेरच्या जगात अनेक बदल दिसले, पण अंतरिक

संघर्ष अजूनही कायम होता. त्याने ठरवलं की तो या आधुनिक जगात आत्मिक शांतीचा संदेश पसरवेल. आधुनिक युगातील तंत्रज्ञान आणि प्रगती जितकी आवश्यक आहे, तितकंच आवश्यक आहे अंतर्मुख होणं, शांतीची साधना करणं, आणि जीवनात संतुलन निर्माण करणं.

ॐ शान्ति!